# बॅलेरीना

चवड्यांवर चारू शरीर फिरे गरगर
आपरा घागरा कटी उडे गोल झरझर
हलत हवेत हात झेपावती उंच वर
चौफेर भिरभिरे लाजरी बुजरी नजर

चवळीची भासे यष्टी जणू मुष्टीही लोण्याची
भाळ विशाल गाल गोबरे मान बलकाची
दंतपंक्ती माळ मोत्यांची चाल गजराजाची
मणी मुक्ताफळ जणू ती नर्तिकासमूहाची

संथ कधी कधी जलदगती नृत्याविष्कार
कर्कश कधी मुलायम त्याला संगीतसाथ
दृष्टीत प्राण ओतून मूक अवाक सभागार
नृत्य संपता उसळे करी टाळ्यांचा गजर

थकली भागली नर्तिका आपुल्या सख्यांसह
झुकुनी कटीत करी सस्मित अभिवादन

– नारायण
१०/१२/२३